# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (महाराष्ट्र)

## पाहिजेत

### तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना मजुरांकडुन व सर्वसामान्य जनतेकडुन प्राप्त होणाऱ्या तक्रारींची चौकशी करुन उचित न्यायनिर्णय देणेसाठी जळगाव जिल्ह्यातील रिक्त पदावर तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman) यांची नेमणूक करावयाची आहे.

**किमान अर्हता:-**

1. उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
2. उमेदवार स्वच्छ प्रतिमा असलेला असावा
3. उमेदवारास लोकप्रशासन/विधी/सामाजिक कार्य/शैक्षणिक किया व्यवस्थापन क्षेत्रातील किमान २० वर्षांचा अनुभव असावा.
4. उमेदवार संबंधित जिल्ल्ह्यातील रहिवाशी असावा.
5. उमेदवाराचे वय दि.01/01/2024 रोजी ६६ वर्षापेक्षा जास्त नसावे.
6. उमेदवार राजकीय पक्षाशी निगडीत किंवा सभासद नसावा.
7. शारीरिकद्दष्ट्या सुद्दढ तसेच जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात, दौरे निरीक्षण करण्यास सक्षम असावा.
8. उपरोक्त पदाची संपूर्ण माहिती जबाबदारी व कर्तव्य आदी तपशिल हा Jalgaon.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**कालावधी व मानधन:-**

1. या पदावरील नियुक्तीचा कार्यकाल दोन वर्षाकरीता असेल. तथापि, कामगिरी समाधानकारक नसल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.
2. तक्रार निवारण प्राधिकारी यांना प्रती बैठक रु. 2250/- या दराने (कमाल रु. 45,000/- प्रतिमाह या मर्यादेत) मानधन देण्यात येईल
3. त्यांचे कार्यालय संबंधित जिल्ह्याचे मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.

अर्जाचा नमुना हा https://jalgaon.nic.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी स्वत:ची शैक्षणिक अर्हता व अनुभवासंबधीच्या प्रमाणपत्रासह परिपूर्ण भरलेले अर्ज खाली नमूद केलेल्या मुदतीत जिल्हाधिकारी कार्यालयातील रोहयो कक्ष येथे **दि.24/03/2024 रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** व्यक्तीश:/टपाल/स्पीडपोस्ट अथवा कुरीअर मार्फत पाठवावेत. **मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.** या प्रक्रियेकरीता प्राप्त होणाऱ्या अर्जापैकी कोणतेही कारण न देता विशिष्ट अर्ज किंवा सर्व अर्ज रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

**मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मंजुरीने**

**उपजिल्हाधिकारी (रोहयो),**
**जळगांव करीता**

D:\1\S1\Ombusdman Files\Order\Order.Docx